थोडक्यात...

मानवत कृषी उत्पन्न बाजार समितीचा कापूस लिलाव ३० मेपर्यंत वाढवला

(दशरथ शिंदे/दै.धर्मयोध्दा)

मानवत - कृषी उत्पन्न बाजार समिती मानवत यांच्या वतीने कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची माहिती जाहीर करण्यात आली आहे. बाजार समिती प्रशासनाने कापूस लिलावाची तारीख २५ मे २०२६ वरून वाढवून आता ३० मे २०२६ पर्यंत करण्यात आल्याचे सांगितले आहे. बाजार समिती प्रशासनाकडून सर्व शेतकरी बांधवांना आवाहन करण्यात आले असून, ज्यांच्याकडे कापूस शिल्लक आहे त्यांनी आपला कापूस ३० मेपर्यंत विक्रीसाठी बाजार समितीत आणावा, असे नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, दिनांक २५ मे २०२६ रोजी खासगी खरेदीमध्ये कापसाला चांगला बाजारभाव मिळाला. त्यानुसार कमाल भाव ९,२१५ रुपये, किमान भाव ९,०५० रुपये तर सरासरी भाव ९,१७५ रुपये प्रति क्विंटल इतका नोंदविण्यात आला. कापसाला समाधानकारक दर मिळत असल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण असून, वाढीव मुदतीमुळे अधिक शेतकऱ्यांना आपला माल विक्रीसाठी आणण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

भावांतर योजना तात्काळ लागू करण्याची स्वाभिमानी शेतकरी संघटनेची मागणी

(दशरथ शिंदे /दै.धर्मयोध्दा)

मानवत- तालुक्यातील शेतकऱ्यांना कापूस व सोयाबीन पिकांच्या दरातील तफावतीमुळे मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत असून शासनाने तात्काळ भावांतर योजना प्रभावीपणे राबवावी, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने तहसीलदार व तालुका दंडाधिकारी यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुका अध्यक्ष नामदेव काळे व युवा तालुका अध्यक्ष दत्तात्रय येरंडे यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, सन २०२५-२६ मध्ये तालुक्यात मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांनी कापूस व सोयाबीनची लागवड केली होती. वाढते बियाणे दर, खतांची टंचाई आणि महागाई यासह अनेक अडचणींना तोंड देत शेतकऱ्यांनी पिके उभी केली. त्यानंतर अतिवृष्टी, ढगफुटी व सततच्या पावसामुळे उत्पादनावरही परिणाम झाला. दिवाळीच्या काळात सोयाबीनला सुमारे ४ हजार रुपये तर कापसाला ७४०० रुपये दर मिळत होता. शासनाने सोयाबीनसाठी ५३२८ रुपये व कापसासाठी ७१०० रुपये हमीभाव जाहीर केला असतानाही खरेदी यंत्रणांनी कमी दरात खरेदी केली. मात्र सध्या बाजारात सोयाबीनला ७५०० रुपये तर कापसाला १० हजार रुपये प्रतिक्विंटल दर मिळत असल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याचे संघटनेने म्हटले आहे. शासनाने बाजारभाव आणि हमीभावातील तफावत लक्षात घेऊन भावांतर योजना राबवून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पणनमंत्री, सीसीआय, पणन महासंघ तसेच कृषी उत्पन्न बाजार समिती मानवत यांना पाठविण्यात आल्या आहेत.

विद्युत पुरवठा सुरळीत करण्याच्या मागणीसाठी महावितरण अभियंत्याच्या कार्यालयात ठिय्या

(गजेंद्र साखरे/दै.धर्मयोध्दा)

सेलू-मागील अनेक दिवसांपासून शिक्षण कॉलनी सर्वोदय नगर, सेलू येथील रहिवासी विजेच्या समस्येमुळे त्रस्त झाले होते. विजेचा पुरेसा दाब न येणे, वारंवार वीज गायब होणे, विजेचा जास्त दाब येऊन घरगुती उपकरणे जळणे अशा अनेक समस्याने नागरिक त्रस्त होते. वारंवार तोंडी सांगून महावितरण ला तक्रार करून काही फरक पडत नव्हता यामुळे गल्लीतील महिला व पुरुष यांनी महावितरण अभियंता सेलू यांच्या ऑफिसमध्ये आंदोलन करून त्यांना या प्रश्नाबद्दल जाब विचारला. तात्काळ हा प्रश्न सोडवावा यासाठी नागरिक चांगलेच आक्रमक झाले होते त्यानंतर अभियंता शंकरवार यांनी तात्काळ या ठिकाणी आपले कर्मचारी पाठवून तात्काळ हा प्रश्न सोडवण्या येईल असे सांगितले व नागरिकांसोबत कर्मचारी पाठवले त्यानंतर नागरिकांनी आंदोलन मागे घेतले यावेळी जयसिंग शेळके, सोनू इंगोले, सुनिता इंगोले, विमल फुलमाळी, शांताबाई ताठे, कमलाबाई भागवत, शारदा ताठे,दिपाली रोहीमल, मीरा हरकळ, वंदना पवार, खेडेकर सर, हरकळ आबा, त्र्यंबक पवार, भागवत सकलादी,भागवत होंडे,योगेश काठोटे, रुस्तुम सोळंके, निलेश मुंदडा व नागरिक उपस्थित होते...

'कार्यसम्राट' आमदार संतोष बांगर यांच्या दारात रोज भरतो जनतेचा महासागर!

हिंगोलीसह पाच जिल्ह्यांतून दररोज १५०-२०० नागरिकांची गर्दी; एका फोनवर सुटतात प्रशासकीय, वैद्यकीय आणि वैयक्तिक समस्या

(महेंद्र पुरी/दै.धर्मयोध्दा)

हिंगोली- ''साहेबांकडे गेलं की काम होणारच!'' ही भावना आता सर्वसामान्यांच्या मनात इतकी दृढ झाली आहे की, कळमनुरी विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आणि कार्यतत्पर आमदार संतोष बांगर यांच्या वंजारवाडा येथील निवासस्थानावर दररोज सकाळी अक्षरशः 'जनता दरबार' भरत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. हिंगोलीपुरतेच मर्यादित न राहता वाशिम, बुलढाणा, परभणी, नांदेड आणि बीड जिल्ह्यांतूनही नागरिक पहाटेपासूनच आमदार बांगर यांच्या भेटीसाठी दाखल होत आहेत. रोज तब्बल १५० ते २०० नागरिक विविध समस्या, अर्ज आणि अपेक्षा घेऊन त्यांच्या दारात पोहोचत असल्याने हे निवासस्थान आता सर्वसामान्यांसाठी आशेचे केंद्र ठरत आहे. सकाळी७वाजताचसुरूहोतेलोकांचीरीघ पहाट उजाडताच वंजारवाडा परिसरात नागरिकांची गर्दी वाढू लागते. सकाळी ७ वाजल्यापासूनच शेतकरी, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि गरजू रुग्ण आपल्या फाईली, अर्ज आणि कागदपत्रांसह आमदार बांगर यांच्या भेटीसाठी रांगेत उभे राहताना दिसतात. यामध्ये शेतीविषयक अडचणी, शासकीय कार्यालयांतील रखडलेली कामे,कौटुंबिक प्रश्न,आरोग्य उपचारासाठी मदत,शैक्षणिक व आर्थिक समस्याअशा विविध प्रश्नांचा समावेश असतो. 'ऑनदस्पॉट'निर्णयामुळेप्रशासनहीअलर्ट जनता दरबाराचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे आमदार बांगर यांची झपाट्याने निर्णय घेण्याची कार्यपद्धती. प्रत्येक नागरिकाचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतल्यानंतर ते तात्काळ संबंधित अधिकारी, विभागप्रमुख किंवा रुग्णालय प्रशासनाला फोन लावतात. त्यांच्या एका फोननंतर प्रशासनाची यंत्रणा तातडीने हलते आणि अनेकांची महिनोनमहिने रखडलेली कामे काही मिनिटांत मार्गी लागत असल्याचे चित्र पाहायला मिळते. त्यामुळे नागरिकांमध्ये ''कामासाठी शेवटची आशा म्हणजे बांगर साहेब'' अशी भावना निर्माण झाली आहे.

वैद्यकीय मदतीसाठी ठरतात आधारवड

विशेष म्हणजे, गंभीर आजारांवरील उपचारासाठी आर्थिक मदत, तातडीची रुग्णालयीन व्यवस्था किंवा शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आमदार बांगर स्वतः लक्ष घालत असल्याने अनेक गरजू कुटुंबांना मोठा दिलासा मिळत आहे. अनेक वेळा रुग्णांच्या उपचारासाठी ते थेट डॉक्टरांशी संवाद साधून उपचार तात्काळ सुरू करण्याचे निर्देश देतात. त्यामुळे ग्रामीण भागातील गरीब आणि गरजूंसाठी त्यांचे निवासस्थान हे मदतीचे हक्काचे ठिकाण बनले आहे.

''रिकाम्या हाताने कुणी परतत नाही''

वाशिमवरून आलेल्या एका नागरिकाने भावना व्यक्त करताना सांगितले, ''आम्ही अनेक दिवस शासकीय कार्यालयांच्या चकरा मारत होतो. पण बांगर साहेबांनी एका फोनवर आमचा प्रश्न सोडवला. इथून कुणीही निराश परत जात नाही.''

लोकप्रियतेचा वाढता आलेख जनतेसाठी सातत्याने उपलब्ध राहणे, तातडीने निर्णय घेणे आणि सामान्य माणसाच्या अडचणी स्वतःच्या मानून काम करणे, या कार्यशैलीमुळे आमदार संतोष बांगर यांना नागरिकांनी 'कार्यसम्राट आमदार' ही उपाधी दिली आहे. दिवसेंदिवस त्यांच्या जनता दरबारात वाढणारी गर्दी ही केवळ लोकप्रियतेची नाही, तर जनतेच्या मनातील अढळ विश्वासाची जिवंत साक्ष ठरत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देवदूत आमदार संतोष बांगर यांना मंत्रीमंडळात स्थान द्यावे अशी मागणी जनतेतून होत आहे.

चक्रवर्ती सम्राट अशोक बुध्द विहार चे माजी सामाजिक न्याय मंत्री आ.धनंजयजी मुंडे यांच्या हस्ते लोकार्पण

(बालासाहेब काळे /दै.धर्मयोध्दा)

परळी वै.- तालुक्यातील सिरसाळा या ठिकाणी तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या रुपाचे अनावरण, बुध्द विहाराचे लोकार्पण माजी सामाजिक न्याय मंत्री धनंजयजी मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी कार्यक्रम चे अध्यक्ष धनंजयजी मुंडे यांचा सत्कार चक्रवर्ती सम्राट अशोक बुध्द विहार, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती, यशोधरा महिला मंडळ सिरसाळा यांच्या वतीने करण्यात आला. बुध्द विहारात तथागत भगवान गौतम बुद्ध यांची प्रसन्न भावमुद्रा असलेली मुर्ती जी स्थापन करण्यात आली होती.ती मुर्ती सौजन्य महादेवजी किरवले यांनी केले.यावेळीअनेक मान्यवर मंडळी ची उपस्थित होती. सुप्रसिध्द गायक आनंदजी शिंदे यांच्या भीमगितावर तरुणाईने थिरकत आनंद घेतला.अनुनयानी तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या चरणी नतमस्तक होत अविस्मरणीय क्षण अनुभवत बहुसंख्येने आपली उपस्थिती दर्शविली.या कार्यक्रमासाठी सिरसाळा पंचक्रोशीतील भिमसैनिक आनंदानी सहभागी उपस्थित राहिले.बुध्द विहार या ठिकाणी आकर्षक रोषणाई व आतषबाजी करण्यात आली होती.या मुळे कार्यक्रमात चैतन्य निर्माण झाले होते.

पदयात्रे दरम्यान जैन साध्वींच्या दुर्दैवी मृत्यूनंतर अंबड येथे जैन समाज आक्रमक निष्पक्ष उच्चस्तरीय चौकशीसह ''राष्ट्रीय संत सुरक्षा धोरण''ची केली मागणी

(रामदास पाटेकर/दै.धर्मयोध्दा)

अंबड- मध्य प्रदेशात दिनांक २० मे २०२६ रोजी कलेक्ट्रेट भवनासमोर विहाररत जैन साध्वी आर्यिका श्री १०५ श्रुतमति माताजी व आर्यिका श्री १०५ उपशममति माताजी यांच्या झालेल्या दुर्दैवी अपघाती निधनानंतर देशभरातील जैन समाजात तीव्र संताप व शोक व्यक्त केला जात आहे. राष्ट्रसंत आचार्य श्री १०८ विद्यासागर जी महाराज यांच्या शिष्यांचा झालेला असामयिक मृत्यू अत्यंत वेदनादायी असल्याची भावना समाजातून व्यक्त होत आहे. ही घटना केवळ साधा रस्ता अपघात नसून या प्रकरणाची निष्पक्ष, पारदर्शक व उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी अंबड येथील सकल जैन समाजाकडून तहसीलदार विजय चव्हाण यांच्या मार्फत सरकारला निवेदनातून करण्यात आली आहे. तसेच संतांच्या सुरक्षेबाबत ठोस निर्णय न घेतल्यास देशभरात तीव्र आंदोलन उभारले जाईल असा जैन समाजाने इशारा दिला आहे. दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे की,उपलब्ध व्हिडिओ क्लिप व इतर तथ्यांच्या आधारे समाजामध्ये संशयाचे वातावरण निर्माण झाले असून संपूर्ण घटनेची सखोल चौकशी आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.जैन साधू-संत हे पूर्णतः अहिंसक, निःशस्त्र आणि पायी विहार करणारे तपस्वी असतात. ते कोणत्याही प्रकारची सुरक्षा किंवा सुविधा स्वीकारत नाहीत आणि समाजाला अहिंसा, संयम व शांततेचा संदेश देतात. अशा संतांवर वाढत्या दुर्घटना आणि हल्ल्यांच्या घटना अत्यंत चिंताजनक असल्याचे जैन समाजाने म्हटले आहे.जैन समाजाने शासन व प्रशासनासमोर काही महत्त्वाच्या मागण्या मांडल्या आहेत. यामध्ये या प्रकरणाची सीबीआय किंवा न्यायालयीन चौकशी करण्यात यावी, घटनेतील सर्व फुटेज, व्हिडिओ व डिजिटल पुरावे सुरक्षित ठेवण्यात यावेत तसेच दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात मागणी करण्यात आली आहे.

तसेच विहाररत साधू-संतांच्या सुरक्षेसाठी विशेष सुरक्षा प्रोटोकॉल लागू करण्यात यावा, संवेदनशील भागात पोलिस संरक्षण, वाहतूक नियंत्रण, चेतावणी फलक व महामार्गांवर विशेष खबरदारी घेण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली. केंद्र सरकारने ''राष्ट्रीय संत सुरक्षा धोरण'' लागू करून पायी विहार करणाऱ्या संतांसाठी विशेष सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वे () तयार करावीत, अशी मागणी जैन समाजाने केली आहे.याशिवाय संतांविरुद्ध होणाऱ्या गुन्ह्यांना विशेष संवेदनशील श्रेणीत समाविष्ट करण्यात यावे तसेच स्थानिक स्तरावर '' '' स्थापन करून प्रशासन व समाज यांच्यात समन्वय व्यवस्था निर्माण करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. जैन समाजाने इशारा दिला आहे की, संतांच्या सुरक्षेबाबत ठोस निर्णय न घेतल्यास देशभरात तीव्र आंदोलन उभारले जाईल.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रेरणा पुरस्काराने बाबासाहेब शेळके यांचा गौरव

(रामदास पाटेकर/दै.धर्मयोध्दा)

अंबड-ज्ञानदिप सामाजिक विकास संस्था, नाशिक यांच्यावतीने दिला जाणारा ''भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार -२०२६'' हा पुरस्कार डोमेगाव (ता. अंबड) येथील सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब राधाकिसन शेळके यांना प्रदान करण्यात आला सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांची या प्रतिष्ठित पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. काल शनिवारी २३ मे २०२६ रोजी नाशिक येथील कामटवाडे परिसरातील समुद्र लॉन्स येथे आयोजित भव्य समारंभात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सोहळ्यात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू तसेच इंदू मिल स्मारकाचे प्रणेते आनंदराज आंबेडकर यांच्या शुभहस्ते बाबासाहेब शेळके यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनिल आठवले,सचिव मिलिंद कळवणकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

सामाजिक बांधिलकी जपत ग्रामीण भागात विविध उपक्रमांच्या माध्यमातून समाजप्रबोधन, जनजागृती व सामाजिक कार्यात सक्रिय योगदान दिल्याबद्दल सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब शेळके यांच्या कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. या पुरस्काराबद्दल त्यांच्यावर डोमेगाव व परिसरातील विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पुरस्कार स्विकारतेवेळी त्यांच्या समवेत पत्नी सौ.सविता शेळके तसेच चिरंजीवाचीही उपस्थिती होती.

धरण उशाशी, कोरड घशाशी; दुधनवाडीत पाण्यासाठी हंबरडा

(नवनाथ गव्हाणे/ दै.धर्मयोध्दा)

बदनापुर- तालुक्यातील दुधनवाडी येथे दलित व मागासवर्गीय वस्तीतील नागरिकांना ग्रामपंचायतच्या ढिसाळ कारभारामुळे भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. नागरिकांचे हाल होत असल्याचा संतप्त आरोप ग्रामस्थांनी केला आहे. पाण्यासारख्या मूलभूत गरजेसाठी महिलांना अक्षरशः वणवण भटकावे लागत असून प्रशासन मात्र ढिम्म असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

ग्रामस्थांनी पंचायत समिती बदनापूर येथील गटविकास अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दलित वस्तीत असलेली विहीर असूनही जाणीवपूर्वक पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येत आहे. एका बाजूला नागरिकांच्या घशाला कोरड पडली आहे. तरी ग्रामपंचायतचे याकडे दुर्लक्ष आहे. कडक उन्हात महिला, लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांना दूरदूरवरून हंडाभर पाणी आणण्यासाठी जीवाची परवड करावी लागत आहे. मात्र ग्रामपंचायत प्रशासनाला याचे कोणतेही सोयरसुतक नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. दलित बांधवांच्या हक्काच्या पाण्यावर खाजगी मोहर टाकून पाणी अडवले जात असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. ''पाणी द्या नाहीतर उपोषणाला सामोरे जा'' असा थेट इशारा ग्रामस्थांनी प्रशासनाला दिला आहे. संबंधित विहिरीवरील खाजगी मोहर तात्काळ हटवून दलित वस्तीला नियमित पाणीपुरवठा सुरू न झाल्यास पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. विशेष म्हणजे या निवेदनावर अनेक महिलांच्या स्वाक्षऱ्या असून पाणीप्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

पूर्णा टायगर संघाची राज्यस्तरीय लंगडी प्रिमियर लीगमध्ये धमाकेदार कामगिरी; सिनिअर गटात प्रथम, ज्युनिअर गटात द्वितीय स्थान

(शेख असद/ दै.धर्मयोध्दा)

पूर्णा - हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यातील कांडली येथे आयोजित राज्यस्तरीय लंगडी प्रिमियर लीग स्पर्धेत पूर्णा येथील एकता क्रीडा मंडळाचा पूर्णा टायगर संघाने दबदबा निर्माण केला. संघाने सिनिअर गटात प्रथम क्रमांक तर ज्युनिअर गटात द्वितीय क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश मिळवले आहे.

महाराष्ट्र लंगडी असोसिएशन व हिंगोली जिल्हा लंगडी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने २३ आणि २४ मे रोजी सनराईज इंग्लिश स्कूलच्या मैदानावर ही स्पर्धा पार पडली. राज्यभरातील नामांकित संघांच्या सहभागाने स्पर्धा अत्यंत चुरशीची झाली होती. पूर्णा टायगर संघाने अंतिम सामन्यात प्रतिस्पर्धी संघावर मात करत विजेतेपदावर नाव कोरले. संघाच्या कर्णधार स्नेहल शिंदे व गौरी भोसले यांनी अष्टपैलू खेळी करत संघाला विजय मिळवून दिला. विजेत्या संघाला ११ हजार रुपये रोख पारितोषिक व आकर्षक चषक देण्यात आला. ज्युनिअर गटातही पूर्णा टायगरच्या खेळाडूंची उत्कृष्ट कामगिरी पाहायला मिळाली. सिद्धी केवडे व ऋतुजा गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली संघाने द्वितीय स्थान पटकावले. या संघाला ७ हजार रुपये रोख पारितोषिक व चषक प्रदान करण्यात आला.

या यशस्वी सहभागासाठी क्रीडा प्रशिक्षक सज्जन जैस्वाल यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. खेळाडूंची यादी: स्नेहल शिंदे, गौरी भोसले, ऋतुजा जोगदंड, आराध्या कु-हे, श्वेता गाढवे, श्रद्धा सूर्यवंशी, अक्षरा नवघरे, स्वरा भायेकर, ईश्वरी पांचाळ, सिद्धी केवडे, ऋतुजा गायकवाड, भक्ती गुट्टे, सिद्धी हिवरे, माणसी तेलंगे, आकांक्षा कु-हे, क्रांती गाढवे, तेजस्विता एंगडे, वैष्णवी कवठे आदी खेळाडूंचा संघात समावेश होता.

पूर्णा टायगर संघाच्या या दैदिप्यमान यशाबद्दल क्रीडा क्षेत्रातून मोठ्या प्रमाणात अभिनंदन व्यक्त करण्यात येत आहे. शहरातील विविध स्तरांवरून खेळाडू आणि प्रशिक्षकांचे कौतुक होत आहे.

हिंगोलीत युवक काँग्रेसचे ''थाळी वाजवा आंदोलन''; नीट पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांना निवेदन

(ज्ञानेश्वर गिरी/ दै.धर्मयोध्दा)

कळमनुरी - नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणातील भ्रष्टाचार, विद्यार्थ्यांवरील अन्याय तसेच शिक्षण व्यवस्थेतील वाढत्या गोंधळाच्या निषेधार्थ हिंगोली जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने जोरदार ''थाळी वाजवा आंदोलन'' करण्यात आले. आंदोलनापूर्वी एनटीसी कार्यालय, हिंगोली येथे युवक काँग्रेस पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीमध्ये आंदोलनाची रूपरेषा ठरविण्यात आली तसेच विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी तीव्र लढा उभारण्याचा निर्धार करण्यात आला. यानंतर युवक काँग्रेसच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर थाळ्या वाजवत आंदोलन करण्यात आले. यावेळी केंद्र सरकार व संबंधित यंत्रणांविरोधात जोरदार घोषणाबाजी करून निषेध व्यक्त करण्यात आला. आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. तसेच आंदोलनानंतर जिल्हाधिकारी तसेच पोलीस अधीक्षक यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, विद्यार्थ्यांना न्याय द्यावा तसेच भविष्यात अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत यासाठी कठोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. यासोबतच राज्याचे शिक्षणमंत्री तसेच देशाचे शिक्षणमंत्री यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ राजीनामा द्यावा, अशीही ठाम मागणी युवक काँग्रेसच्या वतीने करण्यात आली. तसेच नीट परीक्षेच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांनी केलेला कोचिंग, फॉर्म फी, प्रवास, राहण्याचा खर्च व इतर शैक्षणिक खर्च शासनाने विद्यार्थ्यांना परत द्यावा, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी हिंगोली जिल्हाध्यक्ष साईनाथ पाटील जाधव, जिलाउपाध्यक्ष फैसल खान, शेतकरी नेते रमेश शिंदे, तालुका अध्यक्ष बापुराव वढ़तकर, किसन जुमडे, कैलास राठौड़, प्रदेश सचिव बंटी नागरे, राहुल घोडगे, दत्तराव जाधव कडतीकर, पंडितराव जाधव ,विट्ठल मोहनकर,श्रावण काळे, रूपेश लोकडे आदी पदाधिकारी उपस्थित होते. ''विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्या भ्रष्ट व्यवस्थेविरोधात युवक काँग्रेसचा संघर्ष यापुढेही अधिक तीव्रतेने सुरू राहील,'' अशी भूमिका यावेळी युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी मांडली.

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिंटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्मयोध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक-शिंदे रामेश्वर गणपतराव**

DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao